सकाळ

# 'रवळनाथ' सोसायटीतर्फे कर्मचाऱ्यांना विमा कवच

गडहिंग्लज : येथील रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीने आपल्या सर्व कर्मचाऱ्यांचा आरोग्य विमा उतरविला. प्रत्येक कर्मचाऱ्याचा दोन लाखांचा हा आरोग्य विमा आहे. त्याचे वार्षिक हप्त्याचे एकूण तीन लाख २४ हजार ४१३ रुपये संस्थेतर्फे मनिपालसिग्ना प्रोहेल्थ ग्रुप इन्शुरन्स कंपनीकडे भरल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली. रवळनाथ संस्थेने रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. संस्थेला मल्टिस्टेट दर्जा मिळाला आहे. संस्थेच्या वाटचालीत कर्मचाऱ्यांचा मोठा वाटा आहे. त्यामुळेच सर्व कर्मचाऱ्यांना विमा कवच देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला. त्यानुसार विमा हप्त्याची रक्कम कंपनीला भरली. या योजनेमध्ये टायअप असलेल्या हॉस्पिटलमध्ये कर्मचाऱ्यांना कॅशलेस सुविधा मिळणार आहे. रवळनाथच्या आजरा, गडहिंग्लज, चंदगड, नेसरी, कोल्हापूर, जयसिंगपूर, बेळगाव, निपाणी, कुडाळ अशा नऊ शाखा आहेत. एकूण ११५ कर्मचारी कार्यरत आहेत. या सर्वांना विमा कवच मिळाले आहे. त्यांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन दिले जात आहे.

Kolhapur, Kolhapur-Today
08/08/2021 Page No. 4

पुण्य नगरी

# 'रवळनाथ 'च्या कर्मचाऱ्यांना विमा कवच

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

येथील श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीमार्फत संस्थेच्या कर्मचाऱ्यांचा आरोग्य विमा उतरवल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

चौगुले म्हणाले, रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण केलेल्या रवळनाथच्या यशस्वी वाटचालीत कर्मचाऱ्यांचा बहुमोल वाटा आहे. त्यामुळेच यंदापासून त्यांना विमा कवच देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार मनिपालसिग्ना प्रोहेल्थ ग्रुप इन्शुरन्स कंपनीकडे सर्वांचा दोन लाखांचा आरोग्य विमा उतरवला आहे. या आरोग्य विम्याची वार्षिक हप्त्याची ३ लाख २४ हजार ४१३ रुपये इतकी रक्कम संस्थेतर्फे भरण्यात आली आहे. या योजनेत कंपनीने टाय-अप केलेल्या हॉस्पिटलमध्ये कर्मचाऱ्यांना कॅशलेस सुविधा मिळणार आहे.

## कर्मचाऱ्यांतून समाधान

कोरोना महामारीच्या काळात विविध क्षेत्रातील अनेक कर्मचाऱ्यांना नोकरीला मुकावे लागले. परंतू, कोरोना संकटात देखील एकाही कर्मचाऱ्याला कमी न करता किंवा त्यांचा वेतनात कपात न करता कोरोना कवचासह आरोग्य विमा कवचदेखील उपलब्ध करुन दिल्यामुळे रवळनाथ च्या कर्मचाऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे.

09-08-2021
http://www.epunyanagari.com/

तरुण भारत सोमवार, ९ ऑगस्ट २०२१

# रवळनाथ सोसायटीच्या कर्मचाऱ्यांना विमा कवच

**गडहिंग्लज :** रवळनाथ को–ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीच्या कर्मचाऱ्यांचा आरोग्य विमा उतरवण्यात आल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली. विकासात कर्मचाऱ्यांचा बहुमोल वाटा असल्याने संस्थेने विमा कवच देण्याचा निर्णय घेतला आहे. मनिपालसिग्मा प्रोहेल्थ ग्रुप इन्शुरन्स कंपनीकडे सर्वांचा २ लाखाचा विमा उतरविला आहे. सर्व आजारावर उपचाराची सुविधा होणार आहे. यासाठी ३ लाख २४ हजार इतका वार्षिक हप्ता संस्थेने भरला आहे. संस्थेच्या ९ शाखा असून ११५ कर्मचारी आहेत. त्यांना याचा लाभ मिळणार असल्याचे अध्यक्ष चौगुले यांनी सांगितले.